**दि कोल्हापूर अर्बन को ऑप बँक लि.,कोल्हापूर**
**बँक खातेवर कमीत कमी शिल्लक न ठेवल्यास दंड आकारणी धोरण २०२२ – २०२३**

बँकेचे ३१ मार्च २०२२ अखेरचे रिझर्व्ह बँक इन्स्पेक्शन पूर्ण होऊन बँकेस इन्स्पेक्शन अहवाल प्राप्त झाला आहे.सदर अहवालामध्ये बँक खातेवर कमीत कमी शिल्लक न ठेवल्यास रु.३०/- (+GST) दंड आकारत आहे.सदर आकारणी रिझर्व्ह बँक मास्टर परिपत्रक क्र. RBI/2015-16/5 DCBR.BPD.(PCB). MC.No: 6/13.01.000/2015-16 Date July 1,2015 Maintenance of Deposit Accounts मार्गदर्शक तत्वानुसार होत नसलेचा मुद्दा उपस्थित केला आहे.

सदर परिपत्रकानुसार खातेवर किमान शिल्लक न ठेवल्यास शुल्क/दंड आकारणी करताना बँकांनी पुढील कार्यवाही करणेबाबत रिझर्व्ह बँकेने कळविले आहे.

| | |
|---|---|
| १) | ग्राहक व बँक यांच्यात मान्य केल्यानुसार किमान शिल्लक/सरासरी शिल्लक न ठेवल्यास,बँकेने ग्राहकास SMS/ईमेल/पत्र इ. द्वारे कळविणे आवश्यक आहे,की "नोटीस तारखेपासून एक महिन्यांच्या आत खात्यात किमान शिल्लक रक्कमे इतका बॅलेन्स न केल्यास दंड आकारला जाईल." |
| २) | त्यानंतरच १ महिन्यात किमान शिल्लक रक्कमेइतका बॅलेन्स न केल्यास दंड आकारणी करता येईल. |
| ३) | अशाप्रकारे आकारल्या जाणाऱ्या दंडात्मक शुल्काबाबतचे धोरण ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देण्यात आला आहे. |
| ४) | अशी दंडात्मक रक्कम वाजवी असावी आणि सेवा प्रदान करण्याच्या सरासरी खर्चापेक्षा जास्त नसावी. |
| ५) | खातेवर आकारण्यात येणारी दंडात्मक रक्कम कमीत कमी शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक मधील फरकांच्या रक्कमेच्या प्रमाणात असावी. दुसऱ्या शब्दात खाते उघडण्याचे वेळी मान्य केल्याप्रमाणे किमान शिल्लक आणि प्रत्यक्ष शिल्लक यांच्यातील फरकाच्या रक्कमेवर टक्केवारी प्रमाणे दंड रक्कम आकारावी . |
| ६) | बँकेने असे दंडात्मक शुल्क आकारताना खातेवर Debit बॅलेन्स होणार नाही यांची काळजी घेणे आवश्यक आहे. |

सध्या बँक सेवा दर दि.०१/०७/२०११ नुसार खातेवर किमान शिल्लक न ठेवल्यास पुढील प्रमाणे दंड आकारणी करत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सेव्हिंग खातेला | दर तिमाही | रु.३०/- + (GST) |
| २) | चालू खातेस | दर तिमाही | रु.१००/- +(GST) |

त्यापासून आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये बँकेस रु.२५ लाख उत्पन्न मिळाले आहे.

**तरी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या कमीत कमी शिल्लक/ सरासरी शिल्लक न ठेवल्यास आकारले जाणारे दंडात्मक आकारणी बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार पुढील धोरण मंजुरीकरिता सादर**

| | |
|---|---|
| १) | बँकेकडील सेव्हिंग व चालू खातेदार यांचे खातेवर पुढील प्रमाणे किमान शिल्लक ठेवणे अनिवार्य राहील.<br><br>१) सेव्हिंग खातेस — किमान — रु.५००.००<br>२) चालू खातेस — किमान — रु.२०००.००<br><br>ग्राहक व बँक यांच्यात मान्य केल्यानुसार मासिक सरासरी शिल्लक न ठेवल्यास,बँके ग्राहकास SMS/ईमेल/पत्र इ. द्वारे मासिक सरासरी शिल्लक इतकी रक्कम जमा करणेबाबत कळवेल.अशी सूचना वर्षातून एकदाच देण्यात येईल . |
| २) | त्यानंतरच १ महिन्यात मासिक सरासरी शिल्लक रक्कम खातेदाराने जमा न केल्यास दंड आकारणी करेल . |
| ३) | खातेवर आकारण्यात येणारी दंडात्मक रक्कम मासिक सरासरी शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक मधील फरकांच्या रक्कमेच्या प्रमाणात असेल दुसऱ्या शब्दात “खाते उघडण्याचे वेळी मान्य केल्याप्रमाणे मासिक सरासरी शिल्लक आणि प्रत्यक्ष शिल्लक यांच्यातील फरकाच्या रक्कमेवर पुढीलप्रमाणे प्रमाणे दंड रक्कम **तिमाही** आकारण्यात येईल |

| अ.क्र. | मासिक सरासरी शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक फरक | **सेव्हिंग खाते** | मासिक सरासरी शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक फरक | **चालू खाते** |
|---|---|---|---|---|
| 1 | 0 to < 100 | 50/- | 0 to < 500 | 100/- |
| 2 | >=100 to < 200 | 40/- | >=500 to < 1000 | 75/- |
| 3 | >=200 to <300 | 30/- | >=1000 to <1500 | 50/- |
| 4 | >=300 to <400 | 20/- | >=1500 to <2000 | 25/- |
| 5 | >=400 to <500 | 10/- | | |

| | |
|---|---|
| ५) | बँक असे दंडात्मक शुल्क आकारताना खातेवर Debit बॅलेन्स होणार नाही यांची काळजी घेईल. |
| ६) | खातेवर शिल्लक नसताना दंड आकारणी न झालेली रक्कम भविष्यात ज्यावेळी खातेवर बॅलेन्स उपलब्ध होईल त्यावेळी वसूल करण्यात येईल. |
| ७) | वरीलप्रमाणे CBS सिस्टीम मध्ये आवश्यक बदल मंजूर करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी याना राहतील. |
| ८) | बँकेने खातेवरील मासिक सरासरी शिल्लक नियम बदल्यास प्रथम ग्राहकाच्या माहितीसाठी शाखांचे नोटीस बोर्डवर बदलाबाबत नोटीस प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर पहिले ३० दिवस मासिक सरासरी शिल्लक दंड आकरणी जुन्या नियमाप्रमाणे करणेत येईल. |

**मा संचालक मंडळ मिटिंग ठराव नं.       दि. २४.०१.२०२३ ने मंजूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**